बुधवार दि. ०३ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जगदंबा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### चंदनझीरा पोलिसांची अवैध दारूविक्रीविरोधात धडक कारवाई

## १ लाख ३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

### दोन ठिकाणी छापे; दोन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर व परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत चंदनझीरा पोलीस ठाण्याने मंगळवारी (दि. २ जून) दोन स्वतंत्र कारवाया करून अवैध देशी दारूची वाहतूक व विक्री करणाऱ्या दोन जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत देशी दारूच्या २८८ बाटल्यांसह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहने जप्त करण्यात आली असून एकूण १ लाख ३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर अवैध व्यवसायांविरोधात विशेष मोहीम सुरू आहे. त्याअंतर्गत चंदनझीरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना गुप्त माहिती प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी सापळे रचून कारवाई केली.

**राजूर रोडवरील कारवाईत ५४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त**

पहिल्या कारवाईत जालना-राजूर रोडवरील पोरपिंपळगाव परिसरात मोटारसायकलवरून देशी दारूची



चोरटी विक्री करणाऱ्या एका व्यक्तीस पोलिसांनी रंगेहाथ पकडले. चौकशीत त्याने आपले नाव सुरेश भगवान जाधव (वय ३२, रा. मोरंडी मोहल्ला, जुना जालना) असे सांगितले. त्याच्या ताब्यातून देशी सखू संत्रा दारूच्या १४४ बाटल्या तसेच विक्रीसाठी वापरण्यात आलेली होंडा सीडी मोटारसायकल असा एकूण ५४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**त्रिमूर्ती चौकात दुसरी कारवाई**

दुसऱ्या कारवाईत चंदनझीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील त्रिमूर्ती चौक परिसरात एक युवक इलेक्ट्रिक मोटारसायकलवरून देशी दारूची चोरटी विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत विशाल बाळू शिंदे (वय १९, रा. राळा हिवरा) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून देशी सखू संत्रा दारूच्या १४४ बाटल्या आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली इलेक्ट्रिक मोटारसायकल असा एकूण ४९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**दोन्ही कारवाईत २८८ दारूच्या बाटल्या जप्त**

या दोन्ही कारवायांमध्ये एकूण २८८ देशी दारूच्या बाटल्या, दोन वाहने आणि इतर साहित्य असा मिळून १ लाख ३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दोन्ही *(पान २ वर)*

## जाफराबाद-चिखली मार्गावरील जळालेल्या कार प्रकरणाचा २४ तासांत पर्दाफाश

### विम्यासाठी स्वतःच्या मृत्यूचा बनाव; तरुणाची हत्या

### दोन आरोपी अटकेत, मुख्य सूत्रधार फरार, पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी

**दत्ता देशमुख**

जाफराबाद-चिखली मार्गावरील गोपी शिवारात जळालेल्या कारमध्ये सापडलेल्या मृतदेहाच्या गूढ प्रकरणाचा जालना पोलिसांनी अवघ्या २४ तासांत उलगडा केला आहे. स्वतःचा मृत्यू झाल्याचा बनाव करून विम्याची रक्कम मिळवणे आणि कर्जातून मुक्तता मिळवण्यासाठी मुख्य आरोपीने नाशिक येथील एका तरुणाचा खून करून त्याचा मृतदेह कारमध्ये जाळल्याचे तपासात समोर आले आहे.

जाफराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोपी शिवार येथे ३१ मे रोजी पहाटे एका अल्टो



कारला आग लागून त्यामध्ये एका व्यक्तीचा जळून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. प्रथमदर्शनी ही घटना अपघाती वाटत असल्याने जाफराबाद पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू क्रमांक २१/२०२६ दाखल करण्यात आला होता. जिल्हा पोलीस प्रशासनाच्या सूचनेनुसार करण्यात आलेल्या सखोल व तांत्रिक तपासादरम्यान या घटनेमागील धक्कादायक सत्य उघडकीस आले. तपासात कथित मृत व्यक्ती म्हणून समोर आलेला नितीन प्रभाकर गवळी हा जिवंत असल्याचे स्पष्ट झाले. तो मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झाला होता. विम्याची रक्कम मिळवून आर्थिक संकटातून सुटका करून घेण्यासाठी त्याने स्वतःच्या मृत्यूचा बनाव रचल्याचे निष्पन्न झाले.

पोलीस तपासात नितीन गवळी याने त्याचे साथीदार अमित राजू फुलारे आणि आकाश सुधाकर गवळी यांच्या मदतीने नाशिक येथील संदीप चौहाण या तरुणाचा गळा दाबून खून केल्याचे उघड झाले. त्यानंतर मृतदेह अल्टो कारमध्ये ठेवून वाहनास आग लावण्यात आली. जळालेला मृतदेह हा नितीन गवळीचाच असल्याचा आभास निर्माण करून पोलीस व नातेवाईकांची दिशाभूल करण्याचा *(पान २ वर)*

## गायला राष्ट्रीय पशू घोषित करण्याची मागणी; गोवंश तस्करी रोखा, अल्पसंख्याकांवरील अत्याचार थांबवा

### राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) शहर उपाध्यक्ष तय्यब देशमुख यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

गायला राष्ट्रीय पशू घोषित करावे, गोवंशाची कत्तल व परदेशातील निर्यात पूर्णपणे बंद करावी तसेच गायच्या नावाखाली अल्पसंख्याक समाजावर होणारे अत्याचार आणि कायदा हातात घेण्याच्या घटना थांबवाव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविण्यात आले. निवेदनात देशमुख यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात २०१४ पासून गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आला असला तरी त्याच्या अंमलबजावणीदरम्यान अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. गोवंश वाहतूक किंवा खरेदी-विक्रीच्या संशयावरून काही संघटनांकडून नागरिकांना अडवणे, मारहाण करणे किंवा गंभीर स्वरूपाच्या घटना घडत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



देशमुख यांनी नमूद केले की, गोवंश वाहतूक किंवा तस्करी बेकायदेशीर असल्यास कारवाई करण्याचा अधिकार केवळ पोलिस प्रशासन व न्यायव्यवस्थेला आहे. तथापि, काही संघटना स्वतःहून कारवाई करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून कायदा हातात घेण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. निवेदनात त्यांनी असा सवालही उपस्थित केला आहे की, जर गाय हिंदू समाजासाठी पूजनीय आणि मातेसमान मानली जाते, तर गोवंश निर्यातीबाबत स्पष्ट धोरण का राबविले जात नाही? गायच्या संरक्षणाबाबत केंद्र आणि राज्य सरकारने एकसमान व स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

तसेच गोवंश हत्याबंदीमुळे भाकड गायी व कामासाठी अनुपयोगी *(पान २ वर)*

## दिव्यांग पत्रकार राहुल मुळे यांना पाच तास डांबून अमानुष मारहाण; आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यान्वये कारवाईची मागणी

### पत्रकारांच्या शिष्ट मंडळाने घेतली उपविभागीय पोलीस अधिकारी यांची भेट; कारवाईचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी**

जालना येथील दिव्यांग वार्ताचे संपादक तथा पत्रकार राहुल सुरेश मुळे यांना पाच तास बेकायदेशीरपणे एका खोलीत डांबून ठेवत अमानुष मारहाण करण्यात आल्याच्या घटनेमुळे पत्रकार क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करून पत्रकार संरक्षण कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पत्रकार, विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांकडे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पत्रकार राहुल मुळे हे काही दिवसांपूर्वी राजूर रोड परिसरातील तांदुळवाडी शिवारातील एका वॉटर पार्क परिसरात गेले होते. त्या परिसरासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांचा राग मनात धरून काही व्यक्तींनी त्यांना जबरदस्तीने पकडून बेदम मारहाण केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.



**काठ्या, लाठ्या आणि पाईपने मारहाण**

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राहुल मुळे यांना काठ्या, लाठ्या तसेच पाईपने मारहाण करण्यात आली. त्यांना दुपारी सुमारे २ वाजल्यापासून रात्री ८ वाजेपर्यंत एका छोट्या खोलीत डांबून ठेवण्यात आले व बाहेर जाऊ देण्यात आले नाही. हा प्रकार बेकायदेशीर कैद व मानवी हक्कांचे उल्लंघन असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**दिव्यांगत्वाचा गैरफायदा घेत अपमान**

विशेष म्हणजे राहुल मुळे हे दिव्यांग असून त्यांच्या दिव्यांग पायावर तसेच डोळ्यांजवळ मारहाण करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. यावेळी ''लंगड्या'' अशा अवमानकारक शब्दांचा वापर करून त्यांचा अपमान करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे ही घटना केवळ मारहाणीपुरती मर्यादित नसून दिव्यांग व्यक्तीच्या सन्मानावर झालेला गंभीर आघात असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. दबावाखाली बॉण्डवर स्वाक्षरी, मोबाईलचा वापर केल्याचा आरोप मारहाणीनंतर राहुल मुळे यांच्याकडून दबावाखाली एका बॉण्डवर स्वाक्षरी करून घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच त्यांचा मोबाईल ताब्यात घेऊन त्यांच्या नावाने व्हॉट्सअॅप चॅटिंग करण्यात आल्याचाही गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. भविष्यात संबंधितांविरोधात बातमी प्रसिद्ध केल्यास परिणाम भोगावे लागतील, अशा प्रकारच्या धमक्या देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

**ओजस हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू**

या मारहाणीमुळे राहुल मुळे यांची प्रकृती बिघडली असून त्यांच्यावर शहरातील ओजस हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. घटनेमुळे पत्रकार वर्तुळात तीव्र नाराजी व्यक्त होत असून दोषींना तातडीने अटक करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**खोटे गुन्हे दाखल केल्याचाही आरोप**

निवेदनात आणखी एक गंभीर आरोप करण्यात आला आहे. राहुल मुळे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर संबंधित व्यक्तींनी त्यांच्याविरोधात खंडणीसारखे खोटे गुन्हे दाखल केल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून खोट्या तक्रारी व गुन्ह्यांबाबतही संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**सीसीटीव्ही तपासून कारवाईची मागणी**

घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर पत्रकार संरक्षण कायदा, अपहरण, बेकायदेशीर कैद, मारहाण, धमकी आणि दिव्यांग व्यक्तीचा अपमान यासंबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.


**वेळीच कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

या प्रकरणात तात्काळ आणि निष्पक्ष कारवाई न झाल्यास लक्षवेधी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.सदर निवेदनावर सर्वश्री पत्रकार धनसिंह सूर्यवंशी, लियाकत अली खान, दीपक शेळके, आमेर खान, संतोष भूतेकर, सुनील भारती, सय्यद अफसर, नरेश श्रीपत, जावेद खान, सचिन सर्वे, शेख सलीम, अनिल व्यवहारे, शब्बीर पठाण, गौतम वाघमारे, संतोष जाधव, जितेंद्र गाडेकर, एस. पी. झंवर, राम भालेराव यांच्यासह अनेक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## श्रामनेरांना धम्माची अमूल्य शिकवण!

**दत्ता देशमुख**

जालना येथील समर्थ नगर परिसरातील तक्षशिला बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित दहा दिवसीय श्रामनेर संस्कार शिबिरात श्रामनेरांना धम्माची मोलाची शिकवण देण्यात आली. या शिबिरात भदंत थेरो शिवली यांनी श्रामनेरांना त्रिशरण व पंचशील यांचे सखोल मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी नैतिक आचरणाचे महत्त्व पटवून देताना सांगितले की, ''मी चोरी करणार नाही, मी मद्यपान करणार नाही, मी हिंसा करणार नाही, मी व्यभिचारापासून दूर राहीन, मी खोटे बोलणार नाही,'' या पंचशील तत्वांचे पालन केल्याने मानवी जीवन अधिक शुद्ध



आणि संतुलित बनते. तसेच मद्य, अमली पदार्थ आणि इतर मादक वस्तूंपासून दूर राहण्याचे आवाहनही त्यांनी केले. पंचशील ही बौद्ध धर्मातील नैतिकतेची मूलभूत तत्त्वे असून, त्यांचे आचरण केल्यास समाजात शांतता, बंधुभाव आणि मानवी मूल्यांची जपणूक होते, असेही त्यांनी स्पष्ट केले. तथागत बुद्धांनी दिलेल्या या शिकवणीचा अंगीकार करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

या कार्यक्रमास अशोक गंगावणे, अजय ढवळे, संदीप इंगोले, सुप्रिया बगळे, ज्योती मगरे, मिनाबाई शरणागत, चंद्रकांत वाघमारे यांच्यासह तक्षशिला बुद्ध विहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे, भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष राजेश सदावर्ते व गुरूजी रवींद्र दारोकर यांची उपस्थिती होती.



**ग्रामीण महाराष्ट्रातील पारंपरिक संस्कृतीत ''धोंडे जेवण'' ही एक महत्त्वाची सामाजिक परंपरा मानली जाते. आधुनिक काळातही ही परंपरा ग्रामीण संस्कृतीचे जिवंत प्रतीक म्हणून ओळखली जाते. नेमिनाथ कोलते पाटील यांनी आयोजित केलेल्या धोंडे जेवण प्रसंगी कार्यक्रमांत महाराज रुद्रे, रामदास सहाने, राजेश द्वारकुंडे, एकनाथ औताडे, प्रकाश कोल्हे, भानुदास शिंगणे, अजय चव्हाण, मनोज कोलते पाटील, अनिल कोलते पाटील व समस्त कोलते पाटील परिवार.**

# संपादकीय...

## गुटखा, तेच वाहन आणि फरार आरोपी : तपासाच्या दिशेने निर्माण झालेले प्रश्न

जालना पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने २५.८४ लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि वाहने जप्त करून केलेली कारवाई निश्चितच कौतुकास्पद आहे. मानवी आरोग्यास घातक असलेल्या प्रतिबंधित पदार्थांच्या अवैध व्यापारावर लगाम घालण्यासाठी अशा धडक कारवाया आवश्यक आहेत. मात्र या कारवाईने जितकी समाधानाची भावना निर्माण केली, तितकेच काही गंभीर प्रश्नही उपस्थित केले आहेत. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जप्त करण्यात आलेले एमएच-२१-बीजी-८१९९ हे वाहन. उपलब्ध माहितीनुसार याच वाहनाचा यापूर्वीही प्रतिबंधित गुटखा प्रकरणात वापर झाल्याची नोंद आहे. जर एखादे वाहन एका नव्हे तर वारंवार अशा गुन्ह्यांमध्ये आढळून येत असेल, तर त्यामागील नेटवर्क किती मजबूत आहे याचा अंदाज येतो. प्रश्न केवळ वाहनाचा नाही, तर त्या वाहनामागील आर्थिक आणि गुन्हेगारी साखळीचा आहे. याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सतीश ऊर्फ लाला जैस्वाल याचे नाव. संबंधित व्यक्तीवर यापूर्वी मिनी मोक्का अंतर्गत कारवाई झाल्याची माहिती आहे. मिनी मोक्का हा कायदा सामान्य स्वरूपाच्या गुन्हेगारांसाठी नव्हे, तर संघटित गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी वापरला जातो. अशा परिस्थितीत त्या व्यक्तीचा शोध आजही लागलेला नसल्याची चर्चा होत असेल, तर जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. येथे एक गोष्ट स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे की, कोणतीही व्यक्ती न्यायालयीन प्रक्रियेत दोषी सिद्ध होईर्पयंत तिला आरोपी म्हणूनच पाहिले जाते. त्यामुळे कोणाच्याही दोषाबाबत अंतिम निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. मात्र तपास यंत्रणांकडे उपलब्ध असलेल्या धागेदोऱ्यांच्या आधारे संबंधित व्यक्तींचा शोध घेणे आणि सत्य बाहेर आणणे ही त्यांची जबाबदारी आहे. या प्रकरणातील आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे बेवारस वाहने. लाखो रुपयांचा माल असलेली वाहने घटनास्थळी सोडून देणे ही सामान्य बाब नाही. याचा अर्थ गुन्हेगारांना पोलिसांच्या हालचालींची पूर्वकल्पना होती का? की अटकेपासून वाचण्यासाठी मुद्दाम वाहनांचा त्याग करण्यात आला? अशा प्रश्नांची उत्तरे तपासातूनच मिळू शकतात. जालना जिल्ह्यात गुटखा तस्करीची समस्या नवीन नाही. वेळोवेळी कारवाया होतात, लाखो रुपयांचा माल जप्त होतो, गुन्हे दाखल होतात; पण काही दिवसांनी पुन्हा तशाच घटना समोर येतात. याचा अर्थ केवळ किरकोळ वाहतूकदारांवर कारवाई करून प्रश्न सुटत नाही. या व्यवसायामागील वित्तपुरवठा करणारे, साठेबाज, वितरक आणि संपूर्ण साखळी उघड करणे आवश्यक आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईचे स्वागत करतानाच आता जनतेची अपेक्षा केवळ गुटखा जप्त करण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. ''माल कुणाचा?'', ''नेटवर्क कोणाचे?'', ''वारंवार तेच वाहन कसे वापरले जाते?'' आणि ''मिनी मोक्का अंतर्गत कारवाई झालेल्या संशयितांचा शोध नेमका कुठपर्यंत पोहोचला?'' या प्रश्नांची उत्तरेही नागरिकांना हवी आहेत. कायद्याची खरी ताकद केवळ माल जप्त करण्यात नसते, तर त्या गुन्ह्यामागील संपूर्ण रॅकेट उद्ध्वस्त करण्यात असते. जालना पोलिसांनी या प्रकरणात महत्त्वाची सुरुवात केली आहे. आता तपासाचा पुढील टप्पा किती प्रभावी ठरतो, यावर या कारवाईचे खरे यश अवलंबून असेल. जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या अवैध व्यापाराविरोधातील लढाईत केवळ गुटखा जप्त होणे पुरेसे नाही; तर त्यामागील संपूर्ण यंत्रणा उद्ध्वस्त होणे हीच खरी अपेक्षा आहे.

## कर्जमाफीचे स्वागत नाही

### १६४० शेतकऱ्यांच्या बलिदानानंतर सरकारला जाग आली - स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सुरेश काळे

**जालना । प्रतिनिधी**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कर्जमाफीचा निर्णय हा उशिरा घेतलेला असून, या निर्णयाचे स्वागत करण्याऐवजी सरकारने शेतकरी आत्महत्यांबाबत आपली जबाबदारी स्वीकारावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

जालना येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सुरेश काळे म्हणाले की, राज्यातील शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. वाढता उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती, बाजारातील अस्थिरता आणि कर्जाच्या ओझ्यामुळे अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली जीवन जगत आहेत. अशा परिस्थितीत महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर तातडीने कर्जमाफीचा निर्णय अपेक्षित होता. मात्र सरकारने हा प्रश्न दीड वर्ष प्रलंबित ठेवला.

''१६४० शेतकरी आत्महत्या टाळता आल्या असत्या''

सुरेश काळे यांनी सरकारवर निशाणा साधताना म्हटले की, राज्यात दररोज सरासरी तीन शेतकरी आत्महत्या होत आहेत. महायुती सरकारच्या कार्यकाळातील गेल्या दीड वर्षांच्या कालावधीत सुमारे १६४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा दावा त्यांनी केला. जर सरकारने सुरुवातीलाच कर्जमाफीचा निर्णय घेतला असता, तर यातील अनेक शेतकऱ्यांचे प्राण वाचू शकले असते, असेही त्यांनी नमूद केले. ''आज सरकार कर्जमाफीची घोषणा करत आहे. परंतु या निर्णयामागे हजारो शेतकरी कुटुंबांचे दुःख, आर्थिक संकट आणि आत्महत्येच्या घटनांची वेदनादायक पार्श्वभूमी आहे. त्यामुळे या निर्णयाचे श्रेय घेण्यापेक्षा सरकारने उशिरा घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे,'' असे काळे म्हणाले. ''कर्जमाफी हा उपाय, पण अंतिम उत्तर नाही''

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या मते, कर्जमाफी हा शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा देणारा उपाय असू शकतो. मात्र शेतकऱ्यांच्या संकटाचे मूळ कारण दूर करण्यासाठी व्यापक आणि शाश्वत धोरणांची आवश्यकता आहे. काळे यांनी सांगितले की, केवळ कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी सुटणार नाहीत. शेतीमालाला हमीभाव, उत्पादन खर्चावर आधारित किमान आधारभूत किंमत, सिंचनाच्या सुविधा, पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि शेतकऱ्यांना बाजारपेठेतील संरक्षण मिळणे अत्यावश्यक आहे.

# षटकारांचा बादशहा..टीम इंडियाचे वैभव

...अद्भुत, विलक्षण आणि अलौकिक अशा कितीतरी उपमा दिल्या तरी त्याला कमीच पडतील.मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकर, सिक्सर किंग युवराज सिंग आणि हिटमॅन रोहित शर्मानंतर टीम इंडियाचा धडाका सुरु ठेवण्याची परंपरा कोण सांभाळणार असा प्रश्न आम्हा क्रिकेटशौकिनांना पडला होता. पण त्या प्रश्नाचे धडाकेबाज उत्तर मिळाले आहे ते १५ वर्षीय सिक्सर किंग वैभव सूर्यवंशीच्या रूपाने नावाप्रमाणेच खरेच हा छोकरा सूर्यवंशाप्रमाणे क्रिकेट जगताला तोंडात बोटे घालायला लावतोय. लिटल मास्टर सुनील गावसकरांपासून थेट गॉड ऑफ क्रिकेट म्हणून भारतीय क्रिकेटशौकीन ज्याचा उदो उदो करतात त्या सचिन तेंडुलकरांपर्यंत सरावानेच वैभवच्या तुफानी खेळाचे मनापासून कौतुक केलंय. मिस्टर ३६० म्हणून झटपट क्रिकेटमध्ये ज्याला ओळखले जाते त्या दक्षिण आफ्रिकेच्या ए बी डिव्हिलियर्स यानेही सूर्यवंशीचा खेळ खरेच भन्नाट आहे. मात्र त्याने कसोटीत असा खेळ करवून दाखववावा असे मनोगत नुकतेच व्यक्त केले आहे.

डावखुऱ्या सूर्यवंशीने यंदाच्या आयपीएल स्पर्धेत जगातील भल्या-भल्या गोलंदाजांना आपल्या बॅटचे पाणी दाखवत नामोहरम केले आहे. समोर कोण गोलंदाज आहे याची तमा न बाळगता वैभवने त्यांचे चेंडू सीमारेषेपार हवेत टोलावण्याचा पराक्रम केला आहे. वैभवने सर्वात मोठा विश्वविक्रम केला तो एकाच आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकार ठोकण्याचा हा विक्रम क्रिकेटमध्ये युनिव्हर्स बॉस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलच्या नावावर होता. २७ मार्च २०११ रोजी वैभवचा बिहारमध्ये जन्म झाला. सर्वात कमी वयात आयपीएलमध्ये स्थान मिळालेला तो खेळाडू आहे. त्याने जानेवारी २०२४मध्ये बिहारसाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. त्यावेळी त्याचं वय १२ वर्ष २८४ दिवस होतं. त्याने डेब्यूच्यावेळी विजय हजारे ट्रॉफी २०२४-२५ मध्ये बडोदाच्या विरोधात ४२ चेंडूत ७१ धावा ठोकल्या होत्या. तो लिस्ट-ए मध्ये अर्धशतक ठोकणारा सर्वात कमी वयातील भारतीय खेळाडू आहे. बिहारच्या समस्तीपूरच्या वैभवला चार वर्षाचा असल्यापासून क्रिकेट खेळण्याचं वेड लागलं होतं. त्याचे वडील संजीव यांनी त्याच्यासाठी घराच्या मागे एक ग्राऊंड तयार केलं होतं. त्याला वयाच्या नवव्या वर्षी समस्तीपुरच्या एका क्रिकेट अकादमीत दाखल केलं. त्यानंतर वैभवने मागे वळून पाहिलंच नाही. त्याने या मैदानातही वरिष्ठ गोलंदाजांची चांगलीच चंपी केली होती.



वैभव सूर्यवंशीने अंडर-१९ विश्वचषकात सर्वाधिक षटकारांचा विक्रम केला आहे. या सामन्यापूर्वी, वैभव सूर्यवंशीने २०२६ च्या अंडर १९ विश्वचषकात १६ षटकार मारले होते आणि एका १९ वर्षांखालील विश्वचषक आवृत्तीत सर्वाधिक षटकार मारणारा तो इतिहासातील दुसरा खेळाडू बनला होता. पण अंतिम सामन्यातील खेळीत त्याने १३ षटकार लगावत एका खेळीत सर्वाधिक षटकार लगावण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड त्याने केला आहे. एका आयपीएल सीझनमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम वैभवने आधीच आपल्या नावावर केला आहे त्याने सात षटकार मारत त्यामध्ये भर घालत ७२ षटकारांची नोंद केली आहे. याआधी युनिव्हर्स बॉस ख्रिस गेल याच्या नावावर ५९ षटकारांचा हा विक्रम होता. आताच्या वर्षी वैभव हा षटकार किंग असून त्याचा हा विक्रम कोण मोडेल सांगू शकत नाही. गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यामध्ये वैभवने ४७ चेंडूत ९६ धावांची खेळी केली, यामध्ये त्याने ७ षटकार आणि ८ चौकार मारले. या खेळीसह वैभवने आयपीएलच्या इतिहासामधील एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला.

आयपीएलमध्ये १००० धावांचा टप्पा सर्वात वेगाने पार करणारा तो पहिला खेळाडू ठरला. वैभव याने ४४० चेंडूंमध्ये १००० धावा पूर्ण केल्या आहेत. हा विक्रम आधी आंद्रे रसेल याच्या नावावर होता. रसेलने ५४५ चेंडूत ही कामगिरी केली होती. तिसऱ्या स्थानी टीम डेविड ५६० चेंडू, चौथ्या स्थानी ट्रॅव्हिस हेड ५७५ आणि फिल साल्ट आहेत. या सर्व दिग्गजांना वैभवने मागे टाकत हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. या बिहारच्या छोकऱ्याची बॅट इतक्या वेगाने आणि अचूक टायमिंग साधत खाली येते कि गोलंदाजांचा चेंडू पडतेक्षणीच वेगाने सीमापार होतो. सिक्सर किंग युवराजनेही कबूल केलंय कि त्याचीही बॅट एव्हढ्या भन्नाट वेगाने खाली येत नव्हती. अंडर १९ वर्ल्ड कप आणि यंदाची आयपीएल गाजवणाऱ्या १५ वर्षीय सूर्यवंशीने जगातल्या भल्या भल्या क्रिकेटर्सना आपल्या प्रेमात पाडलंय. मात्र माजी कर्णधार सुनील गावसकर आणि मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांनी टीम इंडियाला मिळालेल्या या रत्नाची जोपासना करा, त्याला अनुभवाचे पैलू पाडा आणि जपा असा सल्ला बीसीसीआय आणि भारतीय क्रिकेट धुरिणांना दिलाय वैभवला कसोटीत उतरवण्याची घाई करू नका असा सल्ला सचिन तेंडुलकरने दिलाय. आता भारतीय क्रिकेटचे हे युवा वैभव कसे सांभाळायचे याचा विचार बीसीसीआयने करायचा आहे. एक मात्र खरे हे भारतीय क्रिकेटला गवसलेले यंग ब्लण्डर जागतिक क्रिकेटमध्ये आपला धमाका दाखवून देणार आहे. मात्र या वादळाचा वेग असाच राहो यासाठी बीसीसीआय आणि भारतीय क्रिकेट प्रशासकांनी वैभव सूर्यवंशीला जपायला हवे. कारण वैभवला लाभलेल्या जन्मजात नैसर्गिक आक्रमकतेला अनुभवाचे कोंदण चढवण्याचे काम त्याच्या प्रशिक्षकांना करायचे आहे. अंडर १९ आणि आयपीएलमध्ये सूर्यवंशीने आपला धडाका दाखवलाच आहे. त्याने यंदा अनेक दिग्गजांचे विक्रम आपल्या तुफानी खेळीने मोडले आहेत. ख्रिस गेलचा एका आयपीएल हंगामातील ५९ षटकारांचा विक्रम तब्बल १४ वर्षांनी मोडला गेला आहे. तो विक्रम मोडणारा वैभव नक्कीच टीम इंडियाचे वैभव बनून आपण सूर्यवंशी असल्याचे भविष्यात पुन्हा सिद्ध करेल हीच अपेक्षा आहे.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर**

# काँग्रेसच्या पदनियुक्ती कार्यक्रमात नाराजीचा स्फोट; ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी नेतृत्वाला सुनावले खडे बोल

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर व जिल्हा काँग्रेसच्या नव्या पदनियुक्ती कार्यक्रमात सोमवारी पक्षातील अंतर्गत नाराजी उघडपणे समोर आली. अनेक दशकांपासून काँग्रेस पक्षासाठी कार्यरत असलेल्या ज्येष्ठ आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांनी मंचावरील वरिष्ठ नेत्यांसमोरच आपल्या भावना व्यक्त करत संघटनात्मक निर्णय प्रक्रियेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यामुळे पदनियुक्तीचा उत्सवी कार्यक्रम काही काळासाठी अस्वस्थ आणि तणावपूर्ण वातावरणात परिवर्तित झाल्याचे पाहायला मिळाले.

नव्या शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि वरिष्ठ नेते उपस्थित होते. मात्र कार्यक्रमादरम्यान काही ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी उभे राहून पक्षातील कार्यपद्धतीवर थेट प्रश्न उपस्थित केल्याने सर्वांचेच लक्ष त्या घडामोडीकडे वेधले गेले. ''आम्ही पक्षासाठी आयुष्य घालवले, पण सन्मान मिळाला नाही' यावेळी बोलताना संतप्त कार्यकर्त्यांनी आपल्या मनातील खदखद व्यक्त केली. ''आम्ही ४०-५० वर्षे काँग्रेस पक्षासाठी झटलो. सत्तेच्या काळातही आणि विरोधी पक्षात असतानाही पक्षाशी निष्ठा राखली. प्रत्येक निवडणुकीत मेहनत घेतली. मात्र आज महत्त्वाचे निर्णय घेताना आम्हालाच विश्वासात घेतले जात नाही. बैठकींमध्ये बोलावले जात नाही आणि नियुक्त्यांबाबत कोणतीही चर्चा केली जात नाही,'' अशी खंत त्यांनी व्यक्त केली. कार्यकर्त्यांनी सांगितले की, पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांचा सहभाग आवश्यक असतो. मात्र नियुक्त्यांबाबत निर्णय घेताना जुन्या कार्यकर्त्यांना दूर ठेवले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बंद दाराआड निर्णय झाल्याचा आरोप ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी शहर आणि जिल्हाध्यक्षांच्या नियुक्ती प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या मते, नियुक्त्या करताना पक्षातील अनुभवी कार्यकर्त्यांचा सल्ला घेण्यात आला नाही. निर्णय प्रक्रिया पारदर्शक न राहता काही मोजक्या व्यक्तींपुरती मर्यादित राहिल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

''पक्षाच्या वाढीसाठी आयुष्य घालवणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून संघटना चालवली तर कार्यकर्त्यांचा उत्साह कमी होईल.

पान १ व ४ वरुन....

## चंदनझीरा पोलिसांची...

आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

**अवैध व्यवसायांवर पोलिसांची करडी नजर**

जिल्ह्यात अवैध दारूविक्री, जुगार, मटका, गुटखा आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून अशा कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. चंदनझीरा पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

**कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चंदनझीरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वात पार पडली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक निता दामधर, पोलीस उपनिरीक्षक मारीओ स्कॉट, पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, जितेंद्र तागवाले, मदन बहुरे, विजय बहुरे, नवनाथ पाटील आणि सुधाकर ढाकणे यांचा सहभाग होता.

## जाफराबाद-चिखली...

प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी जाफराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७४/२०२६ दाखल करण्यात आला असून

भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ६२(२) (अ), २३८ (अ) (ब) व ३(५) अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी आतापर्यंत दोन आरोपींना अटक केली असून या कटाचा मुख्य सूत्रधार नितीन गवळी याचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. जळालेल्या मृतदेहाची शास्त्रोक्त ओळख निश्चित करण्यासाठी डीएनए तपासणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अत्यंत गुंतागुंतीच्या या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पवार करीत आहेत.

## गायला राष्ट्रीय...

ठरलेल्या बैलांच्या व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले. पूर्वी शेतकरी अशा जनावरांची विक्री करून नवीन जनावरे खरेदी करत होते. बंदीनंतर अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत आले असून संबंधित व्यवसायाशी निगडित काही घटकांवरही परिणाम झाल्याचा दावा त्यांनी केला आहे.

देशमुख यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गायला राष्ट्रीय पशू घोषित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करताना काही मुस्लिम धार्मिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनीदेखील यापूर्वी अशीच मागणी केल्याचा उल्लेख निवेदनात केला आहे.

देशातील वाढती महागाई, बेरोजगारी, रोजगाराचे प्रश्न, पेट्रोल-डिझेल व स्वयंपाक गॅसच्या वाढत्या किमती यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर सरकारने अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. समाजात हिंदू-मुस्लिम तेढ निर्माण करण्याऐवजी सामाजिक सलोखा व कायद्याचे राज्य मजबूत करण्यासाठी प्रभावी पावले उचलावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शेवटी, गोवंश संरक्षणासंदर्भातील सर्व कारवाई पोलिस यंत्रणेमार्फतच करण्यात यावी, कायदा हातात घेणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनांवर कठोर कारवाई करावी आणि गायच्या नावाखाली कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची सरकारने हमी द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनाची प्रत मुख्यमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच संबंधित प्रशासकीय विभागांना पाठविण्यात आली असल्याची माहिती तय्यब बापू देशमुख यांनी दिली.

## नागरिकांच्या...

तत्काळ दखल घेत घंटागाडी सेवा पूर्ववत सुरू केली. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्ते, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करत असल्याने नगरसेवक अमोल ठाकूर सध्या ''ॲक्शन मोड''मध्ये असल्याचे चित्र प्रभागात पाहायला मिळत आहे.

## जलसंवर्धनाचा संदेश...

आणि विद्यार्थ्यांनी जलसंवर्धनाबाबत विविध घोषणा देत गावातून जनजागृती रॅली काढली. ''पाणी अडवा, पाणी जिरवा'' ''प्रत्येक थेंब अमूल्य आहे'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. रॅलीदरम्यान ग्रामस्थांना पाणी बचतीचे महत्त्व पटवून देण्यात आले तसेच जलस्रोतांचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

तसेच या अभियानासाठी सहारा सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष बिस्मिल्ला सय्यद, तेजस जनविकास संस्थेचे अध्यक्ष शिवाजी तायडे तसेच युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड यांचे विशेष सहकार्य लाभले. विविध सामाजिक संस्था, स्वयंसेवक आणि युवकांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला अधिक प्रभावी स्वरूप प्राप्त झाले. यावेळी डॉ. हटकर, प्रा. मापारी सर, राम शेळके, शीतल वाघ, अर्चना जमदाडे तसेच पाथ्रीकर कॅम्पसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि ग्रामस्थांचा प्रतिसाद यामुळे अभियानाच्या पहिल्याच दिवशी जलसंवर्धनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.

संपूर्ण आठवडाभर चालणाऱ्या या युवा जल दिंडी अभियानामध्ये रॅली, जनजागृती कार्यक्रम, शपथविधी, स्वच्छता उपक्रम, वृक्षारोपण आणि विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून जलसाक्षरतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

## वार्ड क्रमांक ७...

सांगितले. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, टायफॉईड आणि इतर साथीच्या रोगांचा धोका वाढला आहे. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की, दुर्गंधीमुळे घरांच्या खिडक्या उघडणेही कठीण झाले आहे. संध्याकाळच्या वेळी डासांचा त्रास प्रचंड वाढत असून नागरिकांना आरोग्याच्या समस्यांबाबत चिंता वाटू लागली आहे.

**तक्रारी करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष?**

नागरिकांनी अनेक वेळा महानगरपालिका प्रशासनाकडे तक्रारी केल्याचा दावा केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. केवळ पाहणी करून किंवा आश्वासने देऊन प्रश्न सुटत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

''वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. प्रशासनाला नागरिकांच्या आरोग्याची चिंता आहे की नाही?'' असा सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## वडीगोद्री - जालना...

ग्रामस्थ,लोकप्रतिनिधी आणि विविध सामाजिक संघटनांनी यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊनही संबंधित यंत्रणांकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याबद्दल नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार प्रत्येक नागरिकाला जीवन व सुरक्षिततेचा मूलभूत अधिकार असून नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे ही शासन व प्रशासनाची घटनात्मक जबाबदारी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर संबंधित विभागांनी संयुक्त पाहणी करून तातडीने पुढील उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.यामध्ये गतिरोधक बसविणे,झेब्रा क्रॉसिंग व पादचारी मार्गाची व्यवस्था करणे,दिशादर्शक व इशारा फलक उभारणे,खराब साईड पट्ट्यांची दुरुस्ती करणे,शाळा व वस्ती परिसरात वेगमर्यादा निश्चित करणे,रिफ्लेक्टर व स्ट्रीट लाईटची व्यवस्था करणे तसेच अपघातप्रवण स्थळांची अधिकृत नोंद करून कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याचा समावेश आहे.

निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की,निवेदन प्राप्त झाल्यानंतर चार दिवसांच्या आत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यास भविष्यात होणाऱ्या अपघातांसाठी संबंधित अधिकारी,अभियंते व प्रशासकीय यंत्रणांना जबाबदार धरण्यात येईल.

तसेच प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित विभागीय कार्यालयांसमोर धरणे आंदोलन,उपोषण व जनआंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.याशिवाय महाराष्ट्र लोकसेवा हमी अधिनियम २०१५ अंतर्गत वरिष्ठ प्राधिकरणाकडे तक्रार दाखल करणे,महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग व राज्य रस्ता सुरक्षा परिषदेकडे दाद मागणे,तसेच भविष्यात कोणतीही जीवितहानी झाल्यास संबंधित विभागांविरोधात सक्षम न्यायालयात याचिका दाखल करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात,अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली असून आता प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## शेतकरी कर्जमाफीचा...

मिळेल. तसेच कृषी क्षेत्राच्या विकासालाही चालना मिळणार आहे. शेतकरी कल्याणाला प्राधान्य देणाऱ्या मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडवणीस, उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथरावजी शिंदे , मा. ना. श्रीमती सुनेत्रा ताई पवार* आणि राज्य सरकारचे त्यांनी अभिनंदन करत या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागत केले आहे.

## लाडकी बहीण...

कर्जमाफीबाबत महत्त्वाचा निर्णय होईल, असे संकेत दिले होते.

**विरोधकांचा सवाल**

लाडकी बहीण योजनेतील मोठ्या प्रमाणातील अपात्र लाभार्थी उघडकीस आल्यानंतर विरोधकांनी सरकारवर टीका केली आहे. जवळपास ८० लाख लाभार्थी वगळण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## मंठा शहरातील...

उपस्थितांनी व्यक्त केले.यावेळी उपस्थित नागरिकांनी नगरसेविका सौ. सुषमा प्रदीप बोराडे व नगरसेवक श्री. प्रदीप बोराडे यांच्या विकासाभिमुख कार्याचे कौतुक करत, नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल आभार व्यक्त केले. विकासकामांच्या माध्यमातून वॉर्डातील जनतेचा विश्वास सार्थ ठरत असल्याची भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केली.

# घनकचरा वर्गीकरण सक्तीचे; नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई होणार

## ओला, सुका, सॅनिटरी आणि घातक कचरा वेगळा करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांना दंडात्मक कारवाईचे अधिकार

**जालना - प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत कचऱ्याचे स्रोतस्थानी वर्गीकरण करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना दंडात्मक कारवाईचे अधिकार प्रदान करण्यात आले असून, नागरिक, व्यावसायिक आस्थापना आणि मोठे कचरा उत्पादक यांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्रशासनाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, प्रत्येक नागरिकाने आपल्या घरातून निर्माण होणारा कचरा चार स्वतंत्र प्रकारांत वर्गीकृत करून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे द्यावा. यामध्ये ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा आणि विशेष देखभाल/घातक कचरा यांचा समावेश आहे. कचरा मिसळून दिल्यास अथवा नियमांचे पालन न केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते.

**कचऱ्याचे वर्गीकरण का आवश्यक आहे ?**

कचऱ्याचे योग्य वर्गीकरण केल्यास पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे सुलभ होते. यामुळे लँडफिलमध्ये जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन पर्यावरण संरक्षणास मदत होते. तसेच शहर आणि ग्रामीण भागातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक परिणामकारक बनते.

**मोठ्या कचरा उत्पादकांवर विशेष जबाबदारी**

घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार दररोज मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, कार्यालये, शैक्षणिक संस्था, हॉटेल्स, रुग्णालये, बाजारपेठा, गृहसंकुले आणि इतर व्यावसायिक आस्थापनांना () म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. अशा संस्थांनी त्यांच्या परिसरातच ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रक्रिया यंत्रणा उभारणे बंधनकारक आहे.

नियमांनुसार दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा अधिक कचरा ज्यांचे क्षेत्र २० हजार स्के.मी आहे अथवा ४०,००० लिटरपेक्षा जास्त पाणी वापर करणाऱ्या संस्थांनी ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तसेच कचऱ्याचे वर्गीकरण करूनच स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सुपूर्द करणे अपेक्षित आहे. जे निर्देशांचे पालन करणार नाहीत त्यांचे पाणी / वीज पुरवठा थांबविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील सर्व नागरिक, संस्था आणि व्यावसायिक आस्थापनांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ तसेच न्यायालयीन निर्देशांचे पालन करून स्वच्छ, निरोगी आणि प्रदूषणमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

कचऱ्याचे चार प्रकार आहेत

ओला कचरा : स्वयंपाकघरातील अवशेष (भाज्यांचे देठ, पाने, साल), शिळे अन्न, फळांच्या साली व बिया, गवत, बागेतील कचरा, फुले व पाने, चहा व कॉफीचा चोथा, पशुखाद्य अवशेष

सुका कचरा : प्लास्टिक (बाटल्या, पिशव्या, खेळणी), कागद (वर्तमानपत्र, पुस्तके, पुठ्ठा), धातू (ॲल्युमिनियम, स्टील, लोखंड), काच (बाटल्या, तावदाने), लाकडी वस्तू (फर्निचर, बांबू), कापड व चामडे, जुने कपडे, शूज व इतर वस्तू

सॅनिटरी कचरा : सॅनिटरी पॅड, डायपर, फेस मास्क, बँडेज, सॅनिटरी वापरातील वस्तू , संसर्गजन्य पदार्थांचे अवशेष,

विशेष देखभाल / घातक कचरा : बॅटऱ्या (मोबाईल, रिचार्जेबल), ट्यूबलाईट व बल्ब, पेंट, थिनर व रासायनिक पदार्थ, कीटकनाशके व त्यांचे अवशेष, ई-कचरा (जुने फोन, संगणक भाग), सॅनिटायझर व इतर धोकादायक पदार्थ

घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी अधिक कडक होणार असून, प्रत्येक नागरिकाने घरातूनच कचऱ्याचे वर्गीकरण करण्याची सवय लावणे काळाची गरज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# विशेष सहाय्य योजनांतील लाभार्थ्यांसाठी 'बेनेफिशियरी सत्यापन ॲप' द्वारे हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध

**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विशेष सहाय्य योजनांतील लाभार्थ्यांना आता 'बेनेफिशियरी सत्यापन ॲप ()'च्या माध्यमातून डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनांतील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आदी योजनाद्वारे वृध्द, विधवा, निराधार महिला-पुरुष, दिव्यांग व इतर गरजु लाभार्थ्यांना दरवर्षी हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. संबंधित आर्थिक वर्षात लाभार्थ्यांनी प्रमाणपत्र सादर केल्यास बंद करण्यात आलेले अर्थसहाय्य पुन्हा सुरू करण्याची तरतूद शासनाने केली आहे. केंद्र पुरस्कृत योजनांतील लाभार्थ्यांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून हयात प्रमाणपत्र सादर करता यावे यासाठी ' ' ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. याच धर्तीवर राज्य पुरस्कृत योजनांतील लाभार्थ्यांनाही ऑफलाईन प्रक्रियेऐवजी प्रणालीद्वारे ऑनलाईन हयात प्रमाणपत्र सादर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे वृद्ध, विधवा तसेच दुर्धर आजाराने ग्रस्त लाभार्थ्यांना बँक, पोस्ट कार्यालय किंवा तहसील कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता राहणार नाही. लाभार्थी स्वतः मोबाईलद्वारे, नातेवाईकांच्या मदतीने किंवा गावपातळीवरील ग्राम महसूल कर्मचारी, ग्रामपंचायत संगणक परिचालक, सेतू सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र आदींच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने हयात प्रमाणपत्र सादर करू शकतात.

ही सेवा लाभार्थ्यांसाठी निशुल्क असून, सेतू सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रामार्फत सेवा घेतल्यास किमान ५० रुपये सेवा शुल्क देय राहील. लाभार्थ्यांनी स्वतः अथवा कुटुंबीयांच्या मदतीने प्रणालीचा वापर करून हयात प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तहसिलदार (संगायो) प्रणाली तायडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# धुरंधर'मुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका? दिल्ली उच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला चौकशीचे निर्देश

'धुरंधरः द रिव्हेंज' या चित्रपटातील काही दृश्यांमुळे सशस्त्र दलांशी संबंधित गुप्त माहिती उघड होण्याची शक्यता असून, ती देशाच्या सुरक्षेच्या हिताची नाही, असा दावा करणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने बुधवारी महत्त्वपूर्ण निर्देश दिले. मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठाने केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसेच केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळाला या प्रकरणी विचार करून योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. हा चित्रपट काल्पनिक कलाकृती असल्याचा दावा करण्यात आला असला तरी, याचिकाकर्त्याने उपस्थित केलेले मुद्दे गंभीर असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

याचिकाकर्ते दीपक कुमार, जे सशस्त्र सीमा दलात हेड कॉन्स्टेबल (कम्युनिकेशन्स) म्हणून कार्यरत आहेत, यांनी ही याचिका दाखल केली आहे. कुमार यांनी न्यायालयात स्वतः बाजू मांडताना सांगितले की, या चित्रपटाची निर्मिती ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्टचे पालन करून करण्यात आलेली नाही. चित्रपटातील अनेक दृश्यांमध्ये सशस्त्र दलांच्या सामरिक प्रक्रिया आणि कार्यपद्धती उघड करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे देशाच्या सुरक्षेला आणि अखंडतेला धोका निर्माण झाला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

# कलाश्रम च्या वतीने अभियान सन्मान पुरस्कार बॉलीवूड छायाचित्रकार रमाकांत मुंडे यांना प्रधान

दिग्दर्शक-अनंत माने, सिनेपत्रकार- ललिता ताम्हणे, बॉलीवूड फोटोग्राफर-बी. के. तांबे, नेपथ्यकार-अशोक पाळेकर, लेखक दिग्दर्शक जगतकुमार पाटील, आदर्श श्रमिक-पांडुरंग परब, आदर्श गृहिणी-रुक्मिणी परब यांचे स्मरनारार्थ सन्मान दिले गेले. नाटककार, दिग्दर्शक डॉ. अनिल बांदिवडेकर हे कलाश्रमच्या उपक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होते. नेपथ्यकार यश मोडक, सिनेपत्रकार नीलिमा जांगडा, बॉलीवूड छायाचित्रकार रमाकांत मुंडे, पेपर विक्रेता लघुउद्योजक शिवाजी माजलकर हे यंदाचे दखल पत्राचे मानकरी होते.

कलाश्रम च्या वतीने प्रत्येक महिन्याला अभियान सन्मान हा उपक्रम राबवला जातो. ही संस्था स्वातंत्र्यसैनिक डॉ. परशुराम पाटील कला केंद्राच्या अंतर्गत काम करते. यंदा होणारा उपक्रम हा ७७ वा आहे. कुठल्याही साली पण मे महिन्यात दिवंगत झालेल्या सहा व्यक्तींचे स्मरण केले जाते. स्पर्धा, प्रत्यक्ष कलाकृती सादरीकरण, पुस्तक प्रकाशन असे त्याचे स्वरूप असते. ज्या दिवंगतच्या नावाने दखलपत्र दिले जाते तसे कार्य करणाऱ्या गुणी व्यक्तींची निवड केली जाते. यावेळी बॉलीवूड फोटोग्राफर बी. के. तांबे यांच्या नावाचा पुरस्कार बॉलीवूड फोटोग्राफर रमाकांत मुंडे यांना सन्मानपूर्वक देण्यात आला. याशिवाय सिने पत्रकार, लेखिका ललिता ताम्हणे, नेपथ्यकार अशोक पाळेकर, यांचा समावेश होता. त्यांच्या नावाचा पुरस्कार सिने-नाट्य पत्रकार नीलिमा जांगडा, नेपथ्यकार यश मोडक यांची या दखलपत्रासाठी निवड केली आहे. शिवाय प्रत्येक महिन्याला रोख रक्कम आणि मानपत्र असे स्वरूप असलेल्या अव्वल पुरस्काराने ही गुणीजनांचा सन्मान करण्यात येतो. गेल्या नऊ महिन्यापासून ज्या कामगाराच्या मुलांनी कर्तुत्व सिद्ध केलेले आहे. त्याला या पुरस्काराने सन्मानित केले जाते. यंदा दिला जाणारा पुरस्कार हा विसावा होता. या पुरस्कारासाठी कामगार पुत्र, लघुउद्योजक, पेपर विक्रेता शिवाजी माजलकर यांची निवड केली जाते. आदर्श श्रमिक पांडुरंग परब आणि आदर्श गृहिणी रुक्मिणी परब यांच्या स्मृतिदिनाचे निमित्त घेऊन हा पुरस्कार दिला जातो. त्याला ज्येष्ठ रंगकर्मी अशोक परब यांचे मार्गदर्शन लाभलेले आहे. पत्रकार, लेखक अशोक कदम यांनी लिहिलेल्या काव्य भावना या कवितासंग्रहाचे प्रकाशन इथे झाले. या पुस्तकाचे मुखपृष्ठ, मांडणी-सजावट रेखाटन चित्रे आणि प्रस्तावना ही पत्रकार नंदकुमार पाटील यांची आहे. या संस्थेच्या वतीने प्रत्येक महिन्याला अभिनव स्पर्धा घेतली जाते. याच महिन्यातील स्मृतिदिनाचे निमित्त घेऊन लेखक, दिग्दर्शक, ज्येष्ठ रंगकर्मी जगतकुमार पाटील यांच्या नावाने प्रगत नाट्यजगत ही ७०वी स्पर्धा घेण्यात आली होती. त्याचे परिक्षक म्हणून पत्रकार, नाट्य समीक्षक अरुण घाडीगावकर यांनी काम पाहिले आहे. विपुला पाटील यांचे मार्गदर्शन या स्पर्धेला लाभले. शिल्पा कट्टी हे या स्पर्धेच्या समन्वयक आहेत. उपस्थित प्रेक्षकांनी आवर्जून अंतर्मुख व्हावे असा एक उपक्रम या अभियान सन्मानमध्ये होतो. ज्या प्रज्ञावंतांनी महाराष्ट्राचे नाव उज्वल केले अशा प्रज्ञावंताला प्रत्यक्ष कलाकृती सादर करून आदरांजली वाहिली जाते. लेखक, दिग्दर्शक अनंत माने त्यांचे मे महिन्यातील स्मृतिदिनाचे निमित्त घेऊन त्यांनी दिग्दर्शित केलेल्या सांगते ऐका या चित्रपटात बुगडी माझी सांडली गं या गाण्यावर नृत्य अदा पेश करून त्यांना नृत्यांजली वाहिली आहे. नृत्यांगना, नृत्य दिग्दर्शिका सावरी मडव या नृत्याच्या सादरकर्त्या होत्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आश्लेषा परब यांनी केले असून दखलपत्र वाचण्यासाठी कौस्तुभ गोसावी, अस्मिता नामजोशी, सुधाकर आवटे, रत्ना साळुंखे या कलाकारांना निमंत्रित केले होते. सविता जाधव, प्रिया राजपुरकर, लेखा तोरसकर यांचा सुद्धा या कार्यक्रमात सहभाग होता. पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, रवींद्र नाट्य मंदिर, चौथा मजला, चित्रकला दालन, प्रभादेवी येथे हा कार्यक्रम झाला. पत्रकार नंदकुमार पाटील हे या संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष आहेत तर नंदिनी पाटील या संचालिका आहेत.

# मुंबईत 'शिवोत्सव'आणि ३५३ वा राज्याभिषेक सोहळा

**मुंबई - रवींद्र मालुसरे**

शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी अध्याय आहेत, आपल्या महान कार्याने आणि लोककल्याणकारी धोरणांनी त्यांना जगाच्या इतिहासात अढळ स्थान मिळाले आहे. त्यांचा इतिहास भारतातील इतर राज्यातील भाषांतून पोहोचावा याहेतूने श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल या संस्थेच्या वतीने रविवार, दिनांक ७ जून २०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता दादर पश्चिम येथील धुरु हॉलमध्ये ३५३ वा राज्याभिषेक सोहळा

''शिवोत्सव'' आयोजित करण्यात आला आहे, या विनामूल्य कार्यक्रमास शिवप्रेमीनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे संस्थापक डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कृषी अर्थ तज्ज्ञ, केंद्रीय नियोजन आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आणि मुक्तपीठचे संपादक श्री. तुळशीदास भोईटे, शिवराजाभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड समितीचे अध्यक्ष श्री. सुनील पवार, मुंबई बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. संदीप सुर्वे, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष श्री. रवींद्र मालुसरे हे असणार



आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार वेगवेगळ्या माध्यमात सातत्याने कार्यरत राहून जनमानसात पोहोचविणारे सर्वश्री सुप्रसिद्ध मल्लखांब प्रशिक्षक पद्मश्री श्री.उदय देशपांडे (राजमाता जिजाऊ सन्मान पुरस्कार ), सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक, दुर्गसंवर्धक श्री. श्रमिक गोजमगुंडे( हिरोजी इंदुलकर सन्मान पुरस्कार ), शिवचरित्रांची शेकडो पुस्तके आणि दुर्मिळ नाणी आणि वस्तूंचे संग्राहक श्री. राजा जाधव ( सर रामकृष्ण भांडारकर सन्मान पुरस्कार ), हुतात्मा स्मारक समिती प्रमुख, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक श्री. भाऊ सावंत (रामचंद्रपंत अमात्य सन्मान पुरस्कार), शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड समितीचे जनसंपर्क प्रमुख श्री. रंजन गावडे ( सुभेदार तानाजी मालुसरे सन्मान पुरस्कार), मराठाकालीन शस्त्रात्रांचे कलात्मक प्रतिकृती निर्माते रुद्र आर्टचे श्री. सत्यजित वैद्य (वीर बाजीप्रभू देशपांडे सन्मान पुरस्कार ) यांना यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे.

डॉ हेमंतराजे लिखित ''शिवाजी महाराज द ग्रेटेस्ट'' या मोडी लिपी आवृत्ती पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. यापूर्वी हे पुस्तक इंग्रजी, मराठी, हिंदी आणि कन्नड भाषेत प्रकाशित झाले आहे. ह्या पुस्तकाचे मोडी लिपी तज्ज्ञ, लिप्यंतरकार आणि ज्येष्ठ अभ्यासक सर्वश्री रामकृष्ण बुटेपाटील, भाऊ घाडीगावकर, अरविंद कटकधोंड, डॉ. राहुल सारडा, डॉ. तेजस लोखंडे, राम वाघोले, चंद्रशेखर पालव, प्रसाद सुतार, रोहिदास राऊत, तेजस्विनी भावे यांनी आपल्या सुवाच्य अक्षरात मोडी लिपीत लिप्यंतर केले आहे. या सर्वांना शिवकार्याविषयी त्यांच्या ठायी ममत्व असल्यामुळे ठरलेल्या वेळेपूर्वी त्यांनी हे काम पूर्ण केले आहे. त्याप्रित्यर्थ त्यांना ''बाळाजी आवजी चिटणीस सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कुमारी ऋतुजा भोसले, कुमार आरंभ गायकवाड, कुमार अरिहंत जाधव हे शिवबावनी सादरीकरण करणार आहेत. त्याचे गद्य भाषेत सूत्रसंचालन श्री समीर वारेकर आणि प्रा. श्रीमती वर्षा भोसले करणार आहेत.

# पर्यावरणाचे संवर्धन- सामूहिक जबाबदारी

५ जून रोजी जगभरात साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ सभारंभ, वृक्षारोपणाचे सोहळे आणि भाषणांपुरता मर्यादित राहू नये, अशी स्थिती आज निर्माण झाली आहे. यंदा संयुक्त राष्ट्रांनी ''निसर्गाने प्रेरित. हवामानासाठी. आमच्या भविष्यासाठी'' ही संकल्पना जाहीर केली आहे. ही संकल्पना आपल्याला स्पष्ट इशारा देते की, जर आपण निसर्गाच्या रचनेचा आदर केला नाही, तर मानवाचे भविष्य अंधारात असेल.

आज आपण महाराष्ट्रात आणि संपूर्ण देशात हवामान बदलाचे भीषण चटके अनुभवत आहोत. कधी नव्हे एवढा वाढणारा उन्हाळा, अवकाळी पाऊस, गारपीट आणि पाणीटंचाई या समस्या आता ऋतूचक्राचा भाग बनू लागल्या आहेत. ही निसर्गाची चेतावणी आहे. विकासाच्या नावाखाली होणारी अमर्याद जंगलतोड, सिमेंटची जंगले आणि नद्यांमध्ये सोडले जाणारे सांडपाणी यांमुळे आपण स्वतःच आपल्या विनाशाची पावले ओढत आहोत.


आता नुसती चर्चा करून चालणार नाही, तर हवामान कृती ( ) करण्याची वेळ आली आहे. सरकारांनी पर्यावरणपूरक धोरणे राबवणे जेवढे गरजेचे आहे, तेवढेच नागरिकांनी आपली जीवनशैली बदलणे आवश्यक आहे. पाण्याचा सुयोग्य वापर, प्लास्टिकचा संपूर्ण त्याग आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर या छोट्या गोष्टीही मोठा बदल घडवू शकतात. निसर्गाचे रक्षण ही कोणा एकाची जबाबदारी नसून, ती सामुहिक जबाबदारी आहे, आपल्या अस्तित्वाची लढाई आहे. वेळ निघून जाण्यापूर्वी आपण जागे झालो नाही, तर निसर्ग आपल्याला कधीच माफ करणार नाही, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

दरवर्षी ५ जून रोजी जगभरात जागतिक पर्यावरण दिन ( ) उत्साहाने साजरा केला जातो. मानवाचे आरोग्य आणि निसर्गाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे, हा संदेश देण्यासाठी हा दिवस महत्त्वपूर्ण मानला जातो. निसर्ग हा मानवी जीवनाचा आधार आहे. हवा, पाणी, अन्न आणि निवारा या आपल्या मूलभूत गरजा निसर्गामुळेच पूर्ण होतात. परंतु आधुनिकतेच्या आणि विकासाच्या नावाखाली मानवाने निसर्गाचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले आहे. यामुळेच वाढते प्रदूषण, जागतिक तापमानवाढ ( ) आणि हवामानातील बदल यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर लोकांना पर्यावरणाप्रती जागरूक करण्यासाठी दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. निसर्गाचे रक्षण हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे हे लक्षात ठेवायला हवे.

आज मानवाने तंत्रज्ञान आणि औद्योगिकीकरणात मोठी प्रगती केली असली, तरी त्यासाठी निसर्गाची प्रचंड किंमत मोजावी लागली आहे. अवकाळी पाऊस, कडक उन्हाळा, समुद्राच्या पातळीत होणारे बदल आणि चक्रीवादळांचे वाढते प्रमाण हे पृथ्वी आपल्याला देत असलेले गंभीर संकेत आहेत. जंगलांची होणारी कत्तल आणि अमर्याद प्रदूषणामुळे निसर्गाचा समतोल बिघडला आहे. जर आपण आताच ठोस कृती केली नाही, तर हवामान बदलाचे परिणाम पुढील पिढ्यांसाठी अत्यंत घातक ठरू शकतात. संयुक्त राष्ट्रांनी ( ) १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या मानव-पर्यावरण परिषदेमध्ये ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर ५ जून १९७३ रोजी जगभरात पहिला पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी शंभराहून हून अधिक देश या मोहिमेत सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करतात. दरवर्षी या दिवसासाठी संयुक्त राष्ट्रांकडून एक विशेष थीम,संकल्पना निश्चित केली जाते. या संकल्पनेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या विशिष्ट समस्येवर जागतिक पातळीवर लक्ष केंद्रित केले जाते. (उदा. मागील काही वर्षांत प्लॅस्टिक प्रदूषणाचा अंत करणे, प्लास्टिक वापरायला बंदी करणे यांसारख्या संकल्पनांवर भर देण्यात आला आहे). पाणी आणि विजेची बचतः पाण्याचा अपव्यय टाळावा आणि गरज नसताना विजेचा वापर बंद ठेवावा. पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणे आणि नैसर्गिक स्रोतांचे प्रदूषण रोखणे आवश्यक आहे. तीन नियमाचा वापरः कचरा कमी करणे (), वस्तूंचा पुनर्वापर करणे () आणि पुनर्निर्मिती () या सूत्राचा अवलंब करावा. सार्वजनिक वाहनांचा वापरः वैयक्तिक वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतुकीचा किंवा सायकलचा वापर करून वायू प्रदूषण कमी करता येईल.

पर्यायी इंधनाचा वापरः प्रदूषण कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था किंवा इलेक्ट्रिक वाहनांचा () वापर करणे. पर्यावरण सुरक्षित राहिले तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. म्हणूनच, जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी केवळ एक दिवस नव्हे, तर वर्षभर पर्यावरणाचे रक्षण करण्याचा आणि पृथ्वीला हिरवीगार ठेवण्याचा दृढ संकल्प केला पाहिजे.

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर




## ५१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**मंठा । प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर प्रतिष्ठान, मंठा जिल्हा जालना यांच्या वतीने रविवार (दि. ३१ मे २०२६) रोजी ओम रामेश्वराय नमः महादेव (केदारनाथ) मंदिर, सुगंधा नगर, मंठा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजहिताची भावना जोपासत आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. रक्तदान हे श्रेष्ठदान मानले जाते आणि गरजू रुग्णांसाठी रक्ताची आवश्यकता लक्षात घेऊन अनेक युवक, नागरिक व समाजबांधवांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविला. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा आदर्श समोर ठेवत समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून त्यांची जयंती साजरी करण्यात आली. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते, त्यामुळे अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक असल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले. या रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप गायकवाड, आदित्य मिसाळ, आकाश रिकामे, आविष्कार मिसाळ, गणेश मिसाळ, संतोष मिसाळ, राजेश गायकवाड, कृष्णा गायकवाड, सूरज शेंडगे, आशिष शेंडगे,योगेश हातकडके, सुजल काळे, रामा मिसाळ, ओमकार माहोरकर, सचिन तायडे, व अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. यावेळी बाळासाहेब बोराडे, कृष्णा शेरे,दत्ता हातकडके,गणेश गायकवाड, शिवाजी हातकडके, विजय बोराडे,माऊली मिसाळ, गणेश शेंडगे, शिवाजी बनसोडे, यांची प्रमुख उपस्थित होती..

# पिंपरखेड येथे धारदार तलवार बाळगणाऱ्या इसमावर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

## घरझडतीत ३२ इंच लांबीची तलवार जप्त; भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध शस्त्रांवर अंकुश ठेवण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने अंबड तालुक्यातील पिंपरखेड येथे धडक कारवाई करत धारदार तलवार बाळगणाऱ्या एका इसमास ताब्यात घेतले आहे. या कारवाईत आरोपीच्या घरातून ३२ इंच लांबीची धारदार तलवार जप्त करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी जिल्ह्यातील अवैध धारदार शस्त्रांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत होते.

दरम्यान, गुप्त बातमीदारामार्फत पिंपरखेड (ता. अंबड) येथील एका व्यक्तीकडे घरामध्ये धारदार तलवार असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना प्राप्त झाली. या माहितीची पडताळणी करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत रविवारी (दि. १ जून) सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास संबंधित ठिकाणी छापा टाकला.

छाप्यादरम्यान घरामध्ये उपस्थित असलेल्या व्यक्तीची चौकशी केली असता त्याने आपले नाव लक्ष्मण अच्युतराव हजारे (वय ४०, रा. पिंपरखेड, ता. अंबड) असे सांगितले. पोलिसांनी पंचांसमक्ष घराची झडती घेतली असता घरातील समोरील हॉलमध्ये धारदार तलवार आढळून आली. सदर तलवार बेकायदेशीररीत्या बाळगल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी ती जप्त केली.

जप्त करण्यात आलेल्या तलवारीची एकूण लांबी ३२ इंच असून त्यामध्ये २७ इंच लांबीचे धारदार पाते व ५ इंच लांबीची स्टीलची मूठ आहे. तलवारीची रुंदी सुमारे २ इंच असून ती टोकदार आणि वापरण्यायोग्य अवस्थेत असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. जप्त शस्त्राची अंदाजे किंमत दोन हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.


या प्रकरणी आरोपी लक्ष्मण अच्युतराव हजारे याच्याविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३८८/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास अंबड पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या नेतृत्वात सपोनि सचिन खामगळ, देविदास भोजने, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे आणि भागवत खरात यांनी यशस्वीपणे पार पाडली.

जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध अशाच प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# श्रीराम फायनान्सकडून दादागिरीचा आरोप; मनसेचा आक्रमक इशारा

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरात श्रीराम फायनान्सकडून कर्जदार नागरिकांवर दादागिरी केली जात असून बळजबरीने वसुली केली जात असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा सचिव विलास तिकांडे यांनी केला आहे. या प्रकाराविरोधात मनसेने आक्रमक भूमिका घेतली असून संबंधित कंपनीने आपली कार्यपद्धती सुधारावी, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना शांत बसणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे.


विलास तिकांडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आर्थिक अडचणीत सापडलेल्या नागरिकांशी मानवी दृष्टिकोनातून वागण्याऐवजी काही फायनान्स कंपन्यांकडून दबावाचे तंत्र वापरले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. विशेषतः श्रीराम फायनान्सच्या वसुली पद्धतीबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात असल्याचा दावा त्यांनी केला.

''कर्जवसुलीच्या नावाखाली नागरिकांना त्रास देणे, दबाव टाकणे किंवा अपमानास्पद वागणूक देणे खपवून घेतले जाणार नाही. संबंधित कंपनीने कायद्याच्या चौकटीत राहून काम करावे. अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,'' असा इशारा विलास तिकांडे यांनी दिला.

# नागरिकांच्या समस्यांवर तत्पर उपाय; अमोल ठाकूर ॲक्शन मोडमध्ये

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील प्रभाग क्रमांक १६ मधील ओजस कॉलनी परिसरात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या खड्ड्यांमुळे अपघाताची शक्यताही वाढली होती. याबाबत स्थानिक नागरिकांनी नगरसेवक अमोल ठाकूर यांच्याकडे मागणी केल्यानंतर त्यांनी तात्काळ दखल घेत संबंधित कंत्राटदाराला सूचना करून रस्त्यावरील खड्डे बुजवून घेण्याची व्यवस्था केली. खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून परिसरातील नागरिकांनी नगरसेवक अमोल ठाकूर यांचे आभार व्यक्त केले आहेत.



नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्परतेने पुढाकार घेणारे लोकप्रतिनिधी म्हणून अमोल ठाकूर यांची ओळख अधिक दृढ होत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी प्रभाग क्रमांक १६ मधील आनंदनगर, महसूल कॉलनी, रूपनगर, सत्कार नगर, यशवंत नगर, हनुमान नगर, योगेश नगर, अयोध्या नगर, भाग्योदय नगर, सटवाई तांडा व खडकतलाव परिसरात घंटागाडी सेवा बंद असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. याविरोधात अमोल ठाकूर यांनी महानगरपालिकेला इशारा देत, सेवा तात्काळ सुरू न झाल्यास महानगरपालिकेत कचरा टाकून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला होता. या भूमिकेनंतर महानगरपालिकेने (पान २ वर)

# जलसंवर्धनाचा संदेश देत सोमठाण्यात युवा जल दिंडी अभियानाचा शुभारंभ

**जालना - प्रतिनिधी**

जालना : माय भारत जालना, यशदा, युनिसेफ आणि पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमठाणा येथे युवा जल दिंडी अभियानाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. जलसंवर्धन, जलसाक्षरता आणि पाणी बचतीबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे अभियान दि. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत बदनापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात येणार आहे. सदरील अभियानाचे आयोजन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षसंवर्धनाचा संदेश देत वृक्षाला जलदान करून अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सोमठाणा गावाच्या सरपंच स्वाती नागवे, मयूरकुमार गोरमे जिल्हा युवा अधिकारी माय भारत जालना,




सामाजिक कार्यकर्ते संतोष नागवे, उपसरपंच दिलीप मेंढरे, उपकृषी अधिकारी उमेश भोसले, उपकृषी अधिकारी गोपालदास जुंझारे, कृषी सहाय्यक अधिकारी रुपाली भोसले, जलसंधारण विभागाचे जिल्हा संसाधन व्यक्ती मनोहर सरोदे, प्रा. अमृत तारो तसेच डॉ. रामदास निहाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांचा तुळशीचे रोप भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि जलव्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. पाण्याचे वाढते संकट, भूजल पातळीतील घट आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर युवकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

त्यानंतर जल दिंडीची सुरुवात गावातील शहीद सुरेश कदम यांच्या स्मारकाला अभिवादन करून करण्यात आली. जल दिंडीमध्ये सहभागी झालेल्या युवक-युवतींनी (पान २ वर)

# वार्ड क्रमांक ७ मध्ये घाणीचे साम्राज्य

### मामा चौक ते बाबा टी हाऊस परिसरात नागरिकांचे हाल

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील वार्ड क्रमांक ७ अंतर्गत येणाऱ्या मामा चौक ते बाबा टी हाऊस या मुख्य मार्गावरील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून संपूर्ण परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. रस्त्यांच्या कडेला साचलेला कचरा, तुंबलेली गटारे, रस्त्यावर वाहणारे सांडपाणी आणि सर्वत्र पसरलेली दुर्गंधी यामुळे स्थानिक नागरिकांचे जगणे असह्य झाले आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या भागातील नागरिकांना आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप होत आहे. स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, अनेक दिवसांपासून या परिसरात नियमित स्वच्छता होत नसल्याने कचऱ्याचे ढीग वाढत चालले आहेत. गटारांची साफसफाई न झाल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येत असून पादचाऱ्यांसह वाहनचालकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुकानदार, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना या समस्येचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात परिसरात साचलेल्या कचऱ्यामुळे आणि गटारातील सांडपाण्यामुळे मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत असल्याचे नागरिकांनी (पान २ वर)

# वडीगोद्री - जालना महामार्गावरील वाढत्या अपघातांवर संताप ; चार दिवसांत उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**वडीगोद्री - प्रतिनिधी**

जालनावडिगोद्री राष्ट्रीय महामार्गावरील शहापूर, धाकलगाव,मठ तांडा व सुखापुरी फाटा परिसरात वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून याबाबत जिल्हाधिकारी जालना यांना अंतिम निवेदन सादर करण्यात आले आहे.चार दिवसांच्या आत ठोस कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याबरोबरच संबंधित अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाबाबत कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने हे निवेदन देण्यात आले.यावेळी शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र छल्लारे, शहापूरचे सरपंच दशरथ साठे, शिवसेना सर्कल प्रमुख महादेव बोडके, लक्ष्मण भडांगे, दिगंबर शेंडगे,सुनील गायकवाड यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात नमूद केल्यानुसार, प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनुसार गेल्या सहा महिन्यांत या महामार्गावर २१ लहान-मोठे अपघात घडले असून त्यामध्ये ६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तसेच अनेक नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. धाकलगाव, शहापूर, मठ तांडा आणि सुखापुरी फाटा परिसरात शाळा, महाविद्यालये,रुग्णालये तसेच मोठ्या प्रमाणात वस्ती असल्याने नागरिकांना दररोज जीव धोक्यात घालून महामार्ग ओलांडावा लागत असल्याची बाब निवेदनात अधोरेखित करण्यात आली आहे. स्थानिक (पान २ वर)

# शेतकरी कर्जमाफीचा निर्णय स्वागतार्ह - आ.अर्जुनराव खोतकर

**जालना - प्रतिनिधी**



राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून घेतलेला कर्जमाफीचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असून त्यामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असल्याची प्रतिक्रिया शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केली आहे. शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून गेल्या काही वर्षांत नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल घेऊन घेतलेला हा निर्णय त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारा ठरेल, असे आमदार खोतकर यांनी म्हटले आहे. या कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी होऊन त्यांना नव्या जोमाने शेती करण्यास प्रोत्साहन (पान २ वर)

# लाडकी बहीण योजनेत १४ हजार पुरुष लाभार्थी

## ५ लाख सरकारी कर्मचारी, १० लाख आयकरदातेही आढळले - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई -प्रतिनिधी**

मुख्यमंत्री यांनी मंगळवारी माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या पडताळणीबाबत धक्कादायक माहिती उघड केली. सरकारने केलेल्या केवायसी () आणि विविध विभागांच्या डेटाबेस तपासणीत मोठ्या प्रमाणावर अपात्र लाभार्थी आढळून आल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, योजना सुरू करताना महिलांना कागदपत्रे गोळा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा यासाठी सेल्फ सर्टिफिकेशनच्या आधारावर अर्ज स्वीकारण्यात आले होते. मात्र, सरकारी निधीचे लेखापरीक्षण आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी नंतर लाभार्थ्यांची सखोल पडताळणी करण्यात आली. यासाठी आयकर विभाग, सरकारी कर्मचारी वेतन पोर्टल, वाहन मालकीची माहिती आणि रेशन कार्ड डेटाबेस यांचा वापर करण्यात आला.

### पडताळणीत समोर आलेल्या धक्कादायक बाबी

सरकारच्या तपासणीत सुमारे ५ लाख लाभार्थी सरकारी कर्मचारी असल्याचे आढळले. तसेच १० लाख लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न पात्रतेच्या निकषापेक्षा जास्त असल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे महिलांसाठी असलेल्या या योजनेचा लाभ तब्बल १४ हजार पुरुष घेत असल्याचेही तपासणीत उघड झाले. काही प्रकरणांमध्ये चारचाकी वाहनधारक कुटुंबांनाही लाभ मिळाल्याचे निदर्शनास आले.

मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, पात्र महिलांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही आणि सध्या सुमारे १.७० कोटी पात्र महिलांना योजनेचा लाभ सुरू राहणार आहे.

### शेतकरी कर्जमाफीबाबत मोठे संकेत

यावेळी शेतकरी कर्जमाफीच्या प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कर्जमाफीचा विषय मंत्रिमंडळाच्या विचाराधीन असून निवडणूक आयोगाने काही अटींसह प्रक्रियेला परवानगी दिली आहे. सरकार आवश्यक प्रशासकीय मंजुरी देईल; मात्र आचारसंहितेच्या कारणास्तव अधिकृत घोषणा करता येणार नाही. त्यामुळे विधान परिषद निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच कर्जमाफीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

यापूर्वी राज्याचे कृषिमंत्री यांनीही पुढील काही दिवसांत शेतकरी (पान २ वर)

# मंठा शहरातील वॉर्ड क्र. १४ मध्ये सिमेंट काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन उत्साहात; नागरिकांकडून समाधान व्यक्त

**मंठा -प्रतिनिधी**

मंठा शहरातील वॉर्ड क्रमांक १४ मध्ये नागरिकांच्या अनेक दिवसांपासूनच्या मागणीला प्रतिसाद देत सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन व उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. नगरसेविका सौ. सुषमा प्रदीप बोराडे यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या या विकासकामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या विकासकामाचे उद्घाटन वॉर्डातील ज्येष्ठ नागरिक किसनराव हातकडके, दत्तराव चव्हाण, विष्णू नंदाने, दशरथ गोरे आणि शिवाजी बरसाले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विकासकामासाठी शुभेच्छा देत परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी अशाच प्रकारची कामे सातत्याने व्हावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमास आसाराम चव्हाण, दत्ताराव हातकडके, शाम टाके, संजय बोराडे, सचिन चव्हाळ, विजय बोराडे, कृष्णा हेलसकर, दत्ता गोरे, भरत घेणे, प्रदीप घोडके, प्रकाश हातकडके, अर्जुन नंदाने, शेख सर, गायकवाड सर, हुकुमसिंग राजपूत, दीपक मेहता, माऊली लोकरे, विशाल बोराडे, शंकर कचरे, आकाश रिकामे, योगेश बोराडे, निलेश बोराडे, सचिन घेणे, विश्वराज बोराडे, खुशाल मेहता यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतुकीची गैरसोय दूर होणार असून नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ व सुकर मार्ग उपलब्ध होणार आहे. यामुळे वॉर्डाच्या विकासाला नवी चालना मिळणार असल्याचे मत (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.